अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : ११-७-२००५.

श्री./ श्रीमती.......................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा मंगळवार दिनांक १९-७-२००५ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : विषय पत्रिका व टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि.१९-७-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

--÷÷--

१. दुखवटयाचे प्रस्ताव.

२. अहमदनगर महानगरपालिकेचे ग्रामपंचायतीकडील थकीत पाणीपट्टी बीले वसुली कामी अशुध्द् पाणी पुरवठा आकार कमी करुन त्याप्रमाणे सुधारित मागणी करुन ती भरल्यानंतर दंडनिय व विलंब आकार माफ करणें बाबत मा.स्थायी समितीचे शिफारसी नुसार ऑफिस रिपोर्ट .

३. मे.गॅरिसन इंजिनिअर ,एम.ई.एस.,अहमदनगर यांना पुरविण्यांत येणां-या पाणी पुरवठयाचा दर कमी करणें बाबत ऑफिस रिपोर्ट .

४. अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी शहरामध्ये प्रवासी बससेवा बी.ओ.टी.तत्वावर निविदा मागवून सुरु करणें बाबत ऑफिस रिपोर्ट.

५. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

दिनांक : ११-७-२००५
अहमदनगर.

कृपया टिप्पणी मागे पहा....

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. १९-७-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | दुखवटयाचे प्रस्ताव | टिप्पणी नाही. |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेचे ग्रामपंचायती कडील थकीत पाणीपट्टी बीले वसुली कामी अशुध्द् पाणी पुरवठा आकार कमी करुन त्याप्रमाणे सुधारित मागणी करुन ती भरल्यानंतर दंडनिय व विलंब आकार माफ करणें बाबत मा.स्थायी समितीचे शिफारसी नुसार ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. | स्थायी समितीच्या शिफारसी नुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ३ | मे.गॅरिसन इंजिनिअर ,एम.ई.एस., अहमदनगर यांना पुरविण्यांत येणां-या पाणी पुरवठयाचा दर कमी करणें बाबत ऑफिस रिपोर्ट निणयार्थ. | ऑफिस रिपोर्ट नुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी शहरामध्ये प्रवासी बससेवा बी. ओ. टी. तत्वावर निविदा मागवून सुरु करणें बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ | ऑफिस रिपोर्ट नुसार निर्णयास्तव सादर. |
| ५ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज | टिप्पणी नाही. |

दिनांकः११-७-२००५.

नगरसचिव,

अहमदनगर

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : २ दि. १९-७-२००५.

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिकेचे ग्रामपंचायतीकडील थकीत पाणीपट्टी बीले वसुली कामी अशुध्द् पाणी पुरवठा आकार कमी करुन त्याप्रमाणे सुधारित मागणी करुन ती भरल्यानंतर दंडनिय व विलंब आकार माफ करणें बाबत मा.स्थायी समितीचे शिफारसी नुसार ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : गटविकास अधिकारी,पंचायत समिती,अहमदनगर यांनी त्यांचे पत्र क्रमांक ग्रां.पं./ १५२ दिनांक ३१-३-२००४ तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रा.प.) जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी महानगरपालिकेमार्फत ग्रामपंचायतींना होत असलेल्या पाणी पुरवठयाचे थकबाकी बीला बाबत दिनांक २९-३-२००४ रोजी मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.अहमदनगर यांचे दालनांत झालेल्या सभेच्या अनुषंगाने संबंधित ग्रामपंचायतीचे लेखी म्हणणे पत्राने कळविलेले आहे. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांनीही सर्व ग्रामपंचायतींचे थकबाकी न भरण्यांस प्रतिसाद न देण्यांबाबतची कारणे पत्रात नमुद केलेली आहेत.

सर्व ग्रामपंचायतींचे पत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये ग्रामपंचायतींचे एकंदर असे म्हणणे आहे की,दर ३ =४५ वरुन रु.१० /- प्रति १००० लिटर हा दर फारच जास्त असुन तसेच बीलावर १८ % विलंब ( व्याज ) आकार लावणेंत आल्यामुळे दरमहा थकबाकीची रक्कम वाढतच आहे.तसेच ग्रामपंचायतीकडील पाणी पट्टी वसुलीचा दर हा साधारणत : ३६० /- ,४८० /- प्रति कनेक्शन असुन नळ धारकांची संख्याही वाजवीच आहे. व ग्रामीण भाग असल्यामुळे पाणीपट्टी वाढविणे शक्य नाही. उत्पनाचे २० % रक्कम जिल्हा परिषदेला देखभाल दुरुस्ती खाती भरणा करावी लागते. तसेच पाणी बीलापोटी मिळणांरे अनुदान अत्यंत अल्प असुन पाणी बीलाची रक्कम खुपच जास्त आहे. वरवंडी व इतर ५ गांवे देहरे,शिंगवे नाईक,इत्यादी ग्रामपंचायतींचे असे म्हणणे आहे की, त्यांना अशुध्द पाणी पुरवठा केला जातो. परंतु त्याचा दर शुध्द पाण्याचा आकारलेला आहे तसेच हिंगणगांव व खारेकर्जुने यांचे म्हणणेनुसार त्यांना पाणीच मिळत नसुन फक्त बीलाची आकारणी होत आहे. व गावाला टँकरद्वारे पाणी पुरवठा होत आहे.

वरील प्रमाणे सर्व बाबींचा विचार करता सर्व ग्रामपंचायतींचे असे म्हणणे आहे की,रु ३ =४५ प्रति १००० लिटर या प्रमाणे पाण्याची आकारणी करावी.तसेच दंड व्याज कमी करण्यांत यावे तद्नंतर बीलाचा भरणा करण्यांत येईल असे एकंदर दिसुन येते.

तरी संबंधीत ग्रामपंचायती विषयी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद यांनी असे कळविलेले आहे की,त्यांची आर्थिक कुवत व त्यांना प्राप्त होणांरी वार्षिक पाणीपट्टीची रक्कम पाहता त्यांचे म्हणण्यामध्ये तथ्य आढळुन येते. त्यामुळे सहानुभूतीपुर्वक विचार करुन पुनर्विलोकन करुन नव्याने थकबाकी रक्कमा कळविल्यास सदर ग्रामपंचायती थकबाकी भरतील.

तरी गटविकास अधिकारी पंचायत समिती,अ.नगर,उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रा.पं.) यांनी त्यांचे पत्रात नमुद केलेल्या मुद्यांबाबत तसेच दराबाबत आपले स्तरावरुन निर्णय होणेस्तव सविनय ऑफिस रिपोर्ट सादर.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की, “ मनपाच्या पाणीपुरवठयावरील खर्च पाहता कमी दराने सदरील ग्रामपंचायतींना कमी दराने पाणीपुरवठा करणे शक्य होणांर नसल्याबाबत गट विकास अधिकारी,पं.स.अहमदनगर व उपमुख्यकार्यकारी अधिकारी ( ग्रा.पं.) यांना कळविणें योग्य.”

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, “ मजीप्रा तसेच शासनाच्या रॉ वॉटरचा दर किती आहे ? सदरच्या ग्राम पंचायती संबंधित ग्राहकांकडून कोणत्या दराने पाणीपट्टी घेते याची माहिती घेवून फेरसादर करा.

यावर मेकॅनिकल इंजिनिअर,पा.पु.विभाग यांचा फेरसादर रिपोर्ट की,

“ अहमदनगर महानगरपालिके मार्फत एकूण ८ ग्रामपंचायतींना दरमहा पाणीपुरवठा करण्यांत येत असुन त्यापैकी १) वरवंडी व इतर ५ गावे ता.राहुरी २ ) देहरे ३ ) शिंगवे नाईक यांना अशुध्द स्वरुपात पाणी मिळते अशी संबंधित ग्रामपंचायत तसेच गट विकास अधिकारी पंचायत समिती व जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडून वेळोवेळी आलेल्या तक्रारी नुसार सदर ग्रामपंचायतींना मनपा मार्फत सध्या प्रति १००० लिटरला रु.१० /- प्रमाणे दर आकारणी करण्यांत येत असलेला दर खूपच जास्त आहे. व ग्रामपंचायतींचे उत्पन्न खूपच कमी असून शासनाचे अनुदानही कमी मिळते. त्यामुळे मनपा कडील पाणीपट्टी वेळेत भरणे शक्य होत नाही. पर्यायाने थकबाकी वाढत गेलेली असून विलंब आकारही खूपच जास्त असल्यांने सदर वाढीव दराबाबत फेर विचार करण्यांत यावा अशी वेळोवेळी विनंती करण्यांत आलेली होती. त्यानुसार सदर ग्रामपंचायतीची सद्यस्थिती खालील प्रमाणे.

१) सरपंच ग्रामपंचायत वरवंडी व इतर ५ गावे ता.राहुरी यांची एकुण लोकसंख्या १२,७८० /- इतकी असुन त्यांची प्रत्येक कुटुंबाकडून पाणीपट्टी वसूली वार्षिक रु.५५० /- इतकी आहे. त्यांचे म्हणण्यानुसार ग्रामपंचायतीचे पाणीपट्टीद्वारे मिळणांरे वार्षिक उत्पन्न खूपच कमी म्हणजे अंदाजे रु.७ लाख इतके असून शासनाचे अनुदानही कमी मिळते. त्यामुळे पाटबंधारे खात्याच्या रॉ.वॉटरचे दर प्रति १००० लिटरला रु.१.४३ प्रमाणे आमची ग्रामपंचायत पाणीपट्टी भरण्यांस तयार आहे असु सुचित केले आहे.

२) सरपंच ग्रामपंचायत देहरे यांनाही अशुध्द पाणी मिळते. अशी त्यांची तक्रार आहे. त्यांची एकुण लोकसंख्या ५३८१ इतकी आहे. त्यांचे प्रत्येक कुटूंबाकडून वार्षिक पाणीपटटी वसूली रु.४६० /- इतकी असून वार्षिक पाणीपटटी कमी म्हणजे अंदाजे रु.३ लाख इतकी होते. त्यामुळे प्रती १००० लिटरला रु.३.४५ इतकी दर आकारणी करावी. त्यानंतर पाणीपटटी भरण्यांस तयार आहोत असे कळविले आहे.

३) सरपंच ग्रा.पं.शिंगवे नाईक यांची एकुण लोकसंख्या ३१४१ इतकी असून त्यांनाही अशुध्द पाणी मिळते अशी तक्रार आहे.

त्यांची प्रत्येक कुटूंबाकडुन वार्षिक पाणीपटटी वसूली रु.४६० /- इतकी आहे. त्यामुळे पाणीपट्टीचे उत्पन्न खूपच कमी म्हणजे वार्षिक अंदाजे रु.१ लाख इतके होत आहे. व शासनाचे अनुदानही कमी मिळते. त्यांचेही म्हणण्यानुसार पाणीपटटी कमी दराने आकारणी करावी असे म्हणणे आहे.

वरील प्रमाणे ग्रामपंचायतींच्या तक्रारीनुसार त्यांना होणांरा पाणी पुरवठा अशुध्द स्वरुपाचा असून त्यांची सध्याचे वाढीव दराने स्थिती खालीलप्रमाणे .

माहे सप्टेंबर २००४ अखेर थकबाकी.

| अ.नं. | ग्रामपंचायतीचे नांव | दरमहा एकुण पाणी | दर | मासिक आकारणी | एकुण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरवंडी व इतर ५ गांवे | ३०० ला.लि. | १०/- | ३,००,०००/- | १,१८,३३,१५६=०० |
| २ | देहरे ता.नगर | ६० ला.लि. | १०/- | ६०,०००/- | २१,९८,९८५=०० |
| ३ | शिंगवे नाईक,ता.नगर | १०.१० ला.लि. | १०/- | १०,१०० /- | १,८३,१३४=०० |

संबंधित ग्रामपंचायतींनी त्यांचे सध्याचे दर कमी करणें बाबत केलेल्या विनंतीनुसार शासनाचे पाटबंधारे विभागाकडे पाण्याचे दराची चौकशी केली असता रॉ.वॉटरचा दर प्रति १०० लिटरला रु.१.४० इतका असल्याचे दिसुन आले.

त्यामुळे ग्रामपंचायतींनी केलेल्या मागणीनुसार रॉ.वॉटरच्या दराने आकारणी करावयाची झाल्यास पाणीपुरवठा करतांना होणांरा इतर खर्च तसेच सुपरव्हिजन चार्जेस यांचा विचार करुनच अशुध्द पाण्याची आकारणी करावी लागेल.

वरील प्रमाणे तीन ग्रामपंचायतींना महानगरपालिकेकडून सध्या आकारणी केलेला वाढीव दर प्रति १००० लिटरला रु.१० ऐवजी प्रति १००० लिटरला रु.५ /- अशी दर आकारणी करणे योग्य वाटते.

तरी वरील तीन ग्रामपंचायतींचा अशुध्द पाणी वापर म्हणून प्रति १००० लिटरला रु.५ /- इतकी दर आकारणी करणे बाबत आपले स्तरावरुन निर्णय होणेंस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की, अहवालामध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीचे पाणीपुरवठयाचे उत्पन्नाचा तपशिल नमुद आहे. मात्र जरी ग्रामपंचायत या रकमा त्यांचे हद्दीतील कनेक्शन धारकांकडून वसूल करत असल्या तरी त्यातील कोणत्याही रकमा पुन्हा पुन्हा पाठपुरावा करुनही भरत नाहीत. उलटपक्षी यातून उपलब्ध होणांरा निधी अन्यत्र वापरुन कायम थकीत रकमा शिल्लक ठेवत आहेत.

वरील बाब विचारात घेता जरी या ग्रामपंचायतींचे रॉ.वॉटरचे दर कमी केले तरी त्यांचेकडून उचित प्रतिसाद मिळेल असे वाटत नाही.

म.न.पा. ला रॉ.वॉटर साठी शासनास प्रति १००० लिटर रु.१.४० /- द्यावे लागत असून या ग्रामपंचायतींना पाणी देणेपुर्वी त्याचे पंपींग करावे लागते. त्यामुळे पंपींग मशिनरीवरील खर्च,पाणीपुरवठा लाईनचे परिरक्षण व मोठया प्रमाणातील विद्युत बील विचारात घेता हेतुत ः थकबाकीदार (Willful Defaulter ) ग्रामपंचायतींना पुरवठा होत असलेल्या पाण्याचे दर कमी करणे संयुक्तीक ठरणांर नाही.

तरी सुध्दा जर दर कमी करावयाचे झाल्यास त्यांचा लाभ देतांना " विद्युत / वीज संजीवनी योजना " किंवा म.जी.प्रा.ची " निर्भय योजना " या धर्तीवर माफीच्या स्वरुपात या ग्रामपंचायतींना फायदा सक्षम मान्यतेने देणे योग्य राहील.

यामध्ये खालील प्रमाणे योजना प्रस्तावित.

| | | भरावयाची रक्कम | |
|---|---|---|---|
| १ | योजना जाहिर केल्याच्या दिनांकापासुन १ महिन्यांचे आत रक्कम भरल्यास | एकुण थकीत बीलाच्या ५० % रक्कम | भविष्यातील दर रु.५ /- प्रति १००० लिटर पर्यंत कमी करणे |
| २ | योजना जाहिर केल्यानंतर १ ते ३ महिने या कालावधी मध्ये. | एकुण थकीत बीलाच्या ७० % रक्कम | अस्तित्वातील दर रु.६/- पर्यंत ( प्रति १००० लि.) कमी करणें. |
| ३ | योजना जाहिर केल्यानंतर ३ ते ६ महिने या कालावधीत | एकुण थकीत बीलाच्या ८५ % रक्कम | अस्तित्वातील दर रु.७.५० /- पर्यंत कमी करणें. |

मात्र वरील योजनेचा लाभ न घेणां-या ग्रामपंचायतींचे पाणी पुरवठयाचे देयकाची रक्कम वसुलीसाठी कठोर उपाययोजना करुन त्यांचा भविष्यातील पाणीपुरवठा बंद करणे योग्य राहील निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, " मेकॅनिकल इंजिनिअर पाणीपुरवठा यांचे कार्यालयीन टिप्पणी पृष्ठ क्रमांक ३ ते ४ चे प्रस्तावाचे अवलोकन करावे. तसचे याबाबत आयुक्त यांनी टिप्पणी क्रमांक ५ व ६ यावर नोंदविलेले अभिप्राय वाचले. वरवंडी व इतर ५ गांवे आणी देहरे व शिंगवे नाईक ग्रा.पं. यांनी पंचायत समिती,अ.नगर व जि.प.अ.नगर मार्फत पिण्यांचे पाण्यांचे दर कमी करणेंची मागणी केली आहे. तसेच यावर थकबाकीवर लावलेले व्याज आणि विलंब आकार माफ करणेंची मागणी केली आहे.

उपरोक्त प्रकरणांचा अभ्यास केला असता सदरचे गावांना अशुध्द पाणी पुरवठा मुळाधरणाचे पंपींग स्टेशनवरुन मनपा संबंधित गावांना करीत आहे. सदरचे पाणी घेणेंची पाईप लाईन संबंधित ग्रा.पं.नी घातलेली आहे. सध्या मनपाने या गावांना शुध्द पाणीचे दराने पाणीपट्टी आकारणी केली आहे. त्यामुळे संबंधितांचे मागणीमध्ये तथ्य आढळते. तरी मनपाचे पंपींग, परिरक्षण,मनुष्यबळ ,देखभाल,पाणी शुल्क इ.बाबींचा विचार करता अशुध्द पाणी पुरवठा रु.५ /- प्रति हजार दराने कमी करुन संबंधितांकडे सुधारित मागणी कळविणे संयुक्तीक वाटते. याबाबत संबंधितांनी सुधारित पाणीपट्टीची मागणी पुर्ण भरलेनंतर थकबाकीवरील दंडनिय व्याज आणि विलंब आकार माफ करणेंस हरकत नाही.

अशा बाबतच्या ऑफिस रिपोर्ट वर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १४ दि.२९-११-२००४ की, अहमदनगर महानगरपालिकेचे ग्रामपंचायती कडील थकीत पाणीपट्टी बीले वसुली कामी सभे मध्ये झालेल्या सविस्तर साधक - बाधक चर्चेनुसार खालील प्रमाणेची योजना अंमलात आणणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

| | | भरावयाची रक्कम | |
|---|---|---|---|
| १ | योजना जाहिर केल्याच्या दिनांकापासुन ३ महिन्यांचे आत रक्कम भरल्यास | एकुण थकीत बीलाच्या ५० % रक्कम | भविष्यातील दर रुपये पाच प्रति १००० लिटर पर्यंत कमी. |
| २ | योजना जाहिर केल्यानंतर ६ महिने या कालावधी मध्ये. | एकुण थकीत बीलाच्या ७० % रक्कम | अस्तित्वातील दर रु.सहा प्रति १००० लिटर पर्यंत कमी करणें. |
| ३ | योजना जाहिर केल्यानंतर १ वर्ष कालावधीत | एकुण थकीत बीलाच्या ८० % रक्कम | अस्तित्वातील दर रुपये सात पैसे पन्नास पर्यंत कमी करणें. |

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सदर ठरावास मा.श्री.जाधव,कृ.द.मा.श्री.कोतकर भा.ए.,मा.श्री.पवार न.शा.मा.श्री. जगताप नि.वि.मा.श्री.शेख सु.लि.सदस्य स्थायी समिती यांचा विरोध.
सुचक ः मा.श्री.कानडे अ.ना. अनुमोदक ः मा.श्री.पाऊलबुध्दे वि.ना.ठराव बहुमताने मंजूर.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( सा.) मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह व मेकॅनिकल इंजिनिअर यांचे फेर सादर रिपोर्टसह व मा.स्थायी समितीचे शिफारसीनुसार पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

-- * --

ग्रामपंचायतीकडील थकीत पाणीपटटी दर कमी करुन व दंडनिय विलंब आकार माफ करणे बाबत चर्चा खालील प्रमाणे.

१. मा.सौ.यांगिता सत्रे :- यांनी शंका निरसन करावे असे सांगितले किती वर्षापासुन पाणी पुरवठा होत आहे. व अशुध्द पाणी पुरवठा होतो याचे लेखी पत्र आहे काय .

२. मा.महापौर :- यांनी खुलासा केला की, अशुध्द म्हणजे कच्चे पाणी रॉ-वॉटर पुरविण्यांत येत आहे.

३. मा.श्री.सुळ :- यांनी मुद्दा उपस्थित केला की, ग्रामपंचायतींना पाणी मिळत नाही परंतु बिलाची आकारणी केली आहे काय. यावर श्री.निकम इंजिनिअर यांनी खुलासा केला की, मिटर लावणेंत आलेले आहे.

मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, शुध्द पाण्याचा दर अलग आहे. रॉ-वॉटर दर कमी आहे. तथापि या बाबत वसुलीची कारवाई करावी लागेल असे सांगितले.

४. मा.श्री.आगरकर :- यांनी सांगितले की, दर बरोबर आहेत, आज महानगरपालिकेला दरमहा लाईट बिलापोटी अंदाजे ७० लाख रुपये खर्च येतो. पाणी पुरवठा योजना तोटयात चालविली जात आहे. पाण्याच्या दरात सुट दिली तर परवडणार नाही.

५. मा.श्री.मिलींद गंधे :- ८ ते १५ दिवस पाणी पुरवठा होत नाही हे बरोबर आहे काय. पाणीपटटीची वसुली झाली पाहिजे. जोपर्यत वसुली होत नाही. तोपर्यत सरकारी देयके देणे थांबविले पाहिजे.

६. मा.श्री.भानुदास कोतकर :- आपण नेमके काय करणार आहोत याचा खुलासा करावा. ग्रामपंचायती यांना दर परवडत नाहीत. थकबाकी वाढत चाललेली आहे. त्याकरीता त्यांचे दर कमी करण्यांत यावेत रु.३-४५ पैसे दर करण्यांत यावा व थकबाकी तुर्त बाजुला ठेवावी.

मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, शासन याबाबत जबाबदारी घेत नाही. रॉ-वॉटरचे दर रु.५-०० याप्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे.

७. मा.श्री.आगरकर :- यांनी सांगितले की, महानगरपालिकेस ३२ किलोमीटरहुन पाणी पुरवठा होतो. वीज बिलापोटी ६० ते ७० लाख रुपये खर्च येतो. आस्थापना खर्च ही वाढलेला आहे. पाणीपुरवठा योजना तोटयात चालवावी लागते. पाणीपटटी कमी, घरपटटी कमी होत आहे. यामध्ये महानगरपालिकेची भुमिका पाहिली पाहिजे, मा.श्री.कोतकर यांनी आपली भुमिका जरुर मांडावी. इलेक्ट्रीक बिले व थकबाकी भरण्यां बाबत महानगरपालिकेवर टांगती तलवार कायम असते. तरी याबाबत महानगरपालिकेला खर्च परवडत नसल्याने याबाबत विचार जरुर करावा. वाजवी दर आकरुन सामंजस्याची भुमिका घेतली पाहिजे. व संबंधितांना ताकीदही दिली पाहिजे. संस्था चालु राहिल्या पाहिजेत. तरी याबाबत ठराव अगोदर करावा व थकबाकी बाबत जिल्हापरिषदेला अगोदर कळवावे व त्यांचे बरोबर बैठक घ्यावी व थकबाकीचा प्रश्न कसा सोडविता येईल ते पहावे व पुर्वीचा रिपोर्ट मंजूर करावा असे सांगितले.

८. मा.श्री.वाकळे :- यांनी सुचविले की, मेकॅनिकल इंजिनिअर यांनी याबाबत सुचविलेली योजना मंजूर करावी व त्यास परिमल योजना असे नाव द्यावे. मा.महापौरांनी यांस दुजोरा दिला.

--*--

**ठराव :** ठरविण्यांत येते की,ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरहू ग्रामपंचायतीचा दर हा अशुध्द पाण्यासाठीचा लावण्यांस मंजूरी देण्यांत येत असून हा दर रू.५ /- प्रति १००० लि.असा राहिल. याप्रमाणे संबंधितांकडे सुधारित मागणी करावी. सुधारित पाणीपट्टीची मागणी पूर्ण भरलेनंतर थकबाकीवरील दंडनिय व्याज व विलंब आकार माफ करावा. मात्र सदरच्या संस्थेकडे असलेली थकबाकी वसुली कालबध्द कार्यक्रमाचे नियोजन होणेची आवश्यकता लक्षात घेता महापौर यांचे अध्यक्षतेखाली सदर विषयाकरीता बैठक आयोजित करणेंत यावी. त्यामध्ये सर्व पदाधिकारी, मा.आयुक्त , मा.उपायुक्त (सामान्य) मा.उपायुक्त (कर) ,मेकॅनिकल इंजिनिअर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडील व जिल्हा परिषदेकडील संबंधिंत अधिकारी यांची बैठक बोलविण्यांत यावी. सदर बैठकीस मा.नामदार श्री.जयंत पाटील,वित्तमंत्री,महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री,अहमदनगर ,मा.जिल्हा विधानसभा सदस्य (शहर व तालुका) यांचे उपस्थितीत योजना जाहीर करणेसाठी या सन्माननियांनाही विनंतीपत्र पाठविण्यात यावीत.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.मिलींद स.गंधे,अनुमोदक : मा.श्री.दिपक व.सुळ

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक -- ३ दिनांक १९/७/२००५.

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

प्रस्तावाचा विषय - मे.गॅरीसन इंजिनीअर,एम.ई.एस अहमदनगर यांना पुरविण्यात येणा-या पाणी पुरवठयाचा दर कमी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर - मे.गॅरीसन इंजिनीअर एम. ई.एस. यांना पाणी पुरवठा योजना हस्तांतर होण्यापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत होता. त्यावेळी त्यांना प्रतिहजार लिटरला सात रुपये (७ प्रति १००० लि.) या दराने पाण्याची आकारणी करण्यात येत होती.व प्राधिकरणास दरमहा ९ ते १० लाखापर्यत उत्पन्न मिळत होते.

अहमदनगर पाणी पुरवठा योजना दि.१/७/९९ पासून दैनंदिन देखभालीसह तात्कालीन नगरपरिषद असताना हस्तंातरीत झालेली आहे. तेव्हापासून एमईएस यांना म.न.पा.मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत असून त्यावेळी पूर्वीचेच दराने म्हणजे ७ रुपये प्रतिहजार लिटर याप्रमाणे बिलाची आकारणी करुन पाणी बिले देण्यात येत होती. व महानगरपालिकेस ही पाणी बिलापोटी त्याव्दारे उत्पन्न मिळत होते. एप्रिल २००२ पासून त्याचा दर ७ वरुन रु.१० प्रतिहजार लिटर करण्यात येवून त्याप्रमाणे बिले आकारण्यात आली. त्यांनंतर म.न.पा.ने प्रशासकीय ठराव क्र.२ दि.१७/७/२००३ अन्वये माहे जुलै २००३ पासून पाण्याचे दरात वाढ केलेली असून एम.ई.एस. यांना रु.२५/-प्रति हजार लिटर अशी दर आकारणी करण्यात येते. वाढीव दराबाबत एमईएस यांना वेळीच पत्राने कळविण्यात आले होते.

वरीलबाबत मे.गॅरीसन इंजिनीअर,एम.ई.एस यांनी त्यांचे पत्र क्र.४१०४ /१६/इ/४ दि.२२/८/२००३ तसेच चीफ इंजिनीअर पुणे झोन यांचे पत्र क्र. ५३८७ दि. २७/११/२००३ व पत्र क्र.५४०६ दि.१९/१२/ २००३ अन्वये त्यांना पुरविण्यात येण्याच्या पाण्याचे दराबाबत फेंरविचार करावा. तसेच पाण्याचा वापर हा सैनिकांचे कुटूंबांना घरगुती पिण्यासाठीच केला जातो. त्यांचे प्रत्येक कुटूंबास शासनाकडून वार्षिक रु.४०००/-इतकी पाणीपट्टी मंजूर होत असून वाढीव दरामुळे ही रक्कम रु.९०००/- इतकी होत आहे. असे त्यांचे म्हणणे आहे.

त्यामुळे सदरची दरवाढ ही जास्त असल्याचे सांगून एम. ई .एस. ने मनपा कडून होणारा पाणी पुरवठा कमी केलेला होता. त्यानंतर सप्टेंबर २००४ पासून मनपा कडून होणारा पाणी पुरवठा पूर्णपणे बंद केलेला असून फक्त के.के.रेंज (विळद) येथूनच होणारा पा.पु. चालू ठेवलेला आहे. परंतू तोही अल्प प्रमाणात घेत आहे

महानगरपालिकेचे पा.पु.विभागाचे उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीकोनातून एमईएस च्या अधिका-यांसमवेत मा.आयुक्त, साहेबांचे दालनात दि. १४/६/२००५ रोजी बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. सदरच्या बैठकीत एमईएस च्या अधिका-यांनी पा.पु. दर कमी करणेबाबत विनंती करुन सदरचे दर एम. आय. डी .सी. यांना पूरवित असलेल्या दरापेक्षा कमी दराने केल्यास पूर्ववत पाणी घेवू असे सांगितले. व त्याप्रमाणे लेखी पत्र दि.१५/६/२००५ रोजी इकडे दिलेले आहे.

यास्तव एम.आय.डी.सी. यांचेकडून माहिती घेतली असता त्यांचा एम. ई.एस ला पाणी पुरवठा करणारा सध्याचा दर प्रति १००० लिटरला रु.१२.५० असा आहे.

एम.आय.डी.सी यांचेकडून एम.ई.एस यांनी घेतलेल्या पाण्यास पूर्वी रु. १०.५० पैसे प्रतिहजार लिटर असा दर होता. त्यानंतर रु.१७ प्रतिहजार लिटर इतकी वाढ करण्यात आली होती. सदरच्या वाढीव दर कमी करुन सध्या रु. १२.५० प्रतीहजर लिटर इतकी आकारणी करुन एमईएस कडून त्यांना दरमहा २५ ते ३० लाखापर्यत उत्पन्न मिळते.

यास्तव मनपाचे सध्या असलेले दर रु.२५ प्रतिहजार लिटर हे कमी केल्यास एम.ई.एस. यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे ते वसंतटेकडी येथून पाणी घेवू शकतील. वसंतटेकडी व विळद येथून रोज साधारणतः .३००० क्यूबीक मीटर एवढे पाणी मनपा एमइएस यांना पुरवू शकते. एम इ एस चे दर कमी केल्याने ३००० M एवढया पाण्याचे बीलींग मनपा ला मिळू शकते. एम.ई.एस च्या अधिका-यांचे म्हणणेप्रमाणे दर केल्यास मनपाला दरमहा १० ते ११ लाखाचे उत्पन्न मिळू शकेल.

तरी वरीलप्रमाणे एम आय डी सी पाणी पुरवठा व म न पा चे पाणी पुरवठयाचे दरात तफावत असल्याने एम इ एस यांचे संबधीत अधिका-यांचे म्हणण्यानुसार मनपाने पाण्याचे दर कमी केल्यास म्हणजेच सध्याचा दर प्रतीहजार लिटरला रु.२५ /- ही आकारणी कमी केल्यास व नियमीतपणे पुरेशा प्रमाणात पाणी दिल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढू शकेल. यामुळे सदरबाबत उचीत निर्णय घेणेस्तव सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे निर्णय घेणेकामी आदेशार्थ ऑफीस रिपोर्ट सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त ( कर ) यांचा अभिप्राय की,'' सद्यस्थितीत एमईएस हे एम.आय.डी.सी कडून रुपये १२.५० /- प्रति १००० लिटर या दराने पाणी घेत आहे.सदर दरापेक्षा कमी दराने मनपाने पाणी पुरवठा केल्यास एमईएस मनपाकडून पाणी घेण्यास तयार आहे.त्यामुळे मनपाला आर्थिक फायदा होईल.सबब रुपये २५/- प्रति १००० लिटर ऐवजी रुपये १२.००/-प्रति लिटरने एमईएसला पाणी पुरवठा करणे योग्य राहील.सहमत असल्यास मान्यतेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे योग्य

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त कार्यालयीन प्रस्तावाचे अवलोकन केले.एमईएस ला एम आय डी सी चे दरापेक्षा कमी दराने पाणी पुरवठा केलेस मनपाचे पाणी बिलापासूनचे उत्पन्न मोठया प्रमाणावर वाढणार आहे.सदरचा प्रस्ताव मनपाचे आर्थीक हिताचा आहे.तसेच एमईएस हा केंद्र सरकारचा उपक्रम / सेवा असून संरक्षण सेवेचा भाग आहे.सबब प्रस्तावीत कारवाईस विशेष बाब म्हणून मंजूर पाणी दरात बदल करुन सुधारीत दराने पाणी देणेस मंजूरी देणेस हरकत नाही.

अशाबाबतचा ऑफीस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर ) व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

चर्चा :

गॅरिसन इंजिनिअर, एमईएस यांना पुरविण्यांत येणा-या पाणीपुरवठा दर कमी करण्यांबाबतच्या विषयांस मा.श्री.मिलींद गंधे यांनी प्रस्ताव मंजूर करणे बाबत सुचविले. व विषय मंजूर करण्यांत आला.

-- **--

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर ठराव सर्वानुमते मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी. सुचक : मा.श्री.सुरेश छ.शेळके,अनुमोदक :मा.श्री.मिलींद स.गंधे,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ४ दि. १९-७-२००५.

---

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी शहरामध्ये प्रवासी बससेवा बी.ओ.तत्वावर निविदा मागवून सुरु करणें बाबत ऑफिस रिपोर्ट.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : अहमदनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी शहरात प्रवासी बससेवा सुरु करण्यांची तरतूद मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम ६६ (२०) अन्वये नमुद करण्यांत आली आहे. दि.१ जुलै २००३ रोजी शहरात महानगरपालिका अस्तित्वात आली. तत्पुर्वीच १९९९ मध्ये तत्कालीन नगरपालिकेची हद्यवाढ होऊन शहरालगतच्या १२ गावांचा समावेश पालिका हद्यीत करण्यांत आला होता. सन २००१ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ३ लाख ७ हजार होती. त्यात आता वाढ होऊन ती अंदाजे ३ लाख ५० हजारापर्यंत जाऊन पोहोचली आहे.

अहमदनगर शहर वेगाने विस्तारीत होत असतांना नागरिकांना शहराअंतर्गत प्रवास करण्यांसाठी सार्वजनिक स्वरुपाची कोणतीच व्यवस्था उपलब्ध नाही. राज्य परिवहन महामंडळाच्यावतीने ९६-९७ पर्यंत ही सेवा सुरु होती. तथापि त्यानंतर त्यामध्ये हळूहळू खंड पडला कालांतराने ही सेवा पुर्णतः बंद झाली. शहर बस वाहतुक सुरु असतांना नागरिकांना योग्य दरात शहरांतर्गत प्रवासाची व्यवस्था उपलब्ध होती. मात्र ती आतापुर्णपणे बंद असल्यांने नागरिकांना शहराअंतर्गत प्रवासी वाहतुकीची मोठया प्रमाणावर अडचण भेडसावत आहे. शहरबस वाहतुक बंद झाल्यानंतर शहरात सर्वसामान्यत : रिक्षा वाहतुक मोठया प्रमाणावर सुरु झाली. तीन आसनी रिक्षांच्या बरोबरीने सहा आसनी रिक्षाही शहरात सुरु आहेत. अरुंद रस्ते आणि त्यात रिक्षांची वाढलेली प्रचंड संख्या यांचा एकत्रीत परिणाम ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होण्यांवर जाणवू लागला आहे. आजही गर्दीच्या वेळी शहराच्या महत्वाच्या चौकामध्ये विशेषत : दिल्लीगेट,माळीवाडा,बसस्थानकरोड येथे वाहतुक खोळंबल्याचे चित्र पहायला मिळते.

तत्कालीन शहर बस वाहतुक सेवा राज्यपरिवहन मंडळाच्यावतीने राबविली जात होती.महानगरपालिका अस्तित्वात आल्यामुळे अधिनियमांतील तरतुदीनुसार नगरकरांसाठी पालिकेला ही सुविधा स्वतः उपलब्ध करुन देता येऊ शकेल.शहराचा वाढता विस्तार व नागरिकांची वाढलेली आवक जावक विचारात घेऊन महानगरपालिकेने शहर वाहतुक व्यवस्था उपक्रम राबविण्यांची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. तथापि सदर उपक्रम आर्थिक अडचणींमुळे महानगरपालिकेला स्वतंत्रपणे राबविता येणांर नाही. ही वस्तुस्थिती स्पष्ट असल्यामुळे शहर बस वाहतुक सेवा महानगरपालिकेतर्फे खाजगी तत्वावर ( बी.ओ.) चालविण्यांस दिली तर त्यातुन प्रवाशांची सोय होईल. तसेच महानगरपालिकेलाही आर्थिक उत्पन्न मिळु शकेल असे वाटते. शहरातील अरुंद अंतर्गत रस्त्यांचा विचार करता मर्यादीत आसनाच्या छोटया बसेस शहरातुन प्रवासी वाहतुक सोईस्कररित्या करु शकतात.संबंधित खाजगी संस्थेशी तसा करार केला तर महानगरपालिकेला कोणत्याही विशेष आर्थिक भार न सोसता नगरकरांसाठी सदर सुविधा उपलब्ध करुन देता येऊ शकेल शिवाय रॉयल्टी म्हणुन देखील पाच ते दहा टक्के रक्कम महानगरपालिकेला मिळू शकेल. शहरांतर्गत बससेवा कोणतेही खाजगी संस्था त्यांच्या स्वतःच्या खर्चाने नविन बस विकत घेऊन व्यवसायिक तत्वावर सुरु करु शकते. सदर संस्था आपल्या महानगरपालिकेत परिवहन समिती स्थापन

होईपर्यंत स्थायी समितीच्या अधिन राहुन काम करु शकेल तसेच नागरिकांच्या व महानगरपालिकेच्या मागणीनुसार वेळोवेळी व्यवसायीक दृष्टया योग्य अशा मार्गावर बससेवा उपलबध करुन देऊ शकेल.

महानगरपालिकेला तिकीट विक्रीच्या रक्कमेच्या पाच ते दहा टक्क्यापर्यंत रक्कम उपलब्ध होऊ शकेल.महानगरपालिकेच्या वतीने कोणताही खर्च न करता अथवा बस कर्मचा-यांची जबाबदारी न स्विकारता ही सेवा शहरासाठी उपलब्ध होऊ शकेल अशा कोणत्याही खाजगी संस्थेसाठी ठराविक कालावधीकरीता सामंजस्य करार करुन महानगरपालिका बससेवा नगरकरांना उपलब्ध करुन देऊ शकते.

संदर्भिय पत्र क्रमांक २ मध्ये नमुद केलेल्या बाबी पुढीलप्रमाणे रोड ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन ॲक्ट १९५० सेक्शन ३ मधील तरतुदीनुसार राज्यातील रस्ते वाहतुक करण्यांसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची स्थापना करण्यांत आली. त्यानुसार काही महानगरपालिका / नगरपालिका यांची हद्द वगळता संपुर्ण राज्यामध्ये टप्पानिहाय वाहतुक महामंडळाकडुन चालविली जाते. वास्तविक नगरपालिका / महानगरपालिका हद्दी मध्ये प्रवाशी वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्यांची जबाबदारी संबंधित नगरपालिका / महानगरपालिका यांची आहे. नगरपालिका / महानगरपालिका यांची नगरपालिका / महानगरपालिका यांच्या हद्दीमध्ये प्रवासी वाहतुक करणे ही प्राथमिक जबाबदारी असूनही रा.प.महामंडळ शहर वाहतुक चालवत आहे. अहमदनगर शहर बस वाहतुकीसाठी सरासरी ४ ...... व ७५६.२ दैनंदिन कि.मी.चालविण्यांत येत असुन या वाहतुकीमुळे महामंडळास गत ५ वर्षा मध्ये ( सन २००३-२००४ पर्यंत ) सुमारे रु.१.९८ कोटी तोटा झाला आहे.

रा.प.महामंडळाच्या तोटयामध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्यांने अशा स्थितीत शहरी वाहतुक चालविणें महामंडळांस केवळ अशक्य आहे. शहरी वाहतुकीमुळे होणांरा तोटा काही अंशी कमी व्हावा या उद्देशाने महामंडळाच्या मालमत्तेवर आकारण्यांत येणांरे विविध कर माफ करण्यांत यावेत. तसेच देण्यांत येणां-या सुविधांमध्ये सवलत मिळावी. याबाबतचे प्रस्ताव आपणांकडे पाठविण्यांत आले होते. तथापि याबाबत आपणांकडून प्रतिसाद मिळाला नाही.

रा.प.महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती विचारात घेता तोटयामध्ये चालणांरी शहर बस वाहतुक यापुढे चालू ठेवणें महामंडळास केवळ अशक्य असून ती येत्या तीन महिन्यांमध्ये बंद करण्यांचा निर्णय घेण्यांत आला आहे. तरी नागरिकांची वाहतुकीबाबत गैरसोय होऊ नये यासाठी शहर बस वाहतुक दिनांक १५-९-२००५ पासुन ताब्यात घेऊन आपणांमार्फत चालवावी असे कळविले आहे.

संदर्भिय पत्र क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या बाबी पुढीलप्रमाणे सदर संस्थेने अकोला महानगरपालिके बरोबर १० वर्षाचा सामंजस्य करार करुन बी.ओ.टी.तत्वावर शहर बस वाहतुक " परिवहन उपक्रम " १३ बसेस खरेदी करुन सुरु केला आहे. या प्रकल्पास अकोलेकरांकडून मिळणां-या प्रचंड प्रतिसादामुळे आणखी नविन २७ बसेस वाढविण्यांचा प्रस्ताव अकोला म.न.पाने मंजुर केला आहे. या धरतीवर अहमदनगर म.न.पा.ने हा उपक्रम सुरु केल्यास म.न.पा.ला.कोणत्याही प्रकारचा खर्च न करता दर महिन्यांला शहर बससेवा निधीद्वारे ५ % रॉयल्टी द्वारे स्वामित्व धन जमा होऊ शकते. ( म.न.पा.ने नगरकरांसाठी ४० बसेस टाटा ४०७ बसेस कार्यरत केल्यास दरमहा म.न.पा.स उत्पन्न अंदाजे १ १/२ ते २ लाख पर्यंत हमखास मिळु शकेल. ) या उपक्रमाद्वारे म.न.पा.च्या आर्थिक उत्पन्नात भर पडून शहर वासियांना " स्वस्त आणि सुरक्षित प्रवास " चे माध्यम उपलब्ध होऊ शकते.

तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई दि. १६-६-२००५ च्या पत्राचा आढावा घेतला असता शहरबसवाहतुक सेवेमध्ये त्यांना गतपाचवर्षामध्ये सुमारे रु. १.९८ कोटी तोटा झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे अ.नगर म.न.पा.ने स्वत : हा उपलक्रम राबविल्यास अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. तसेच त्यामध्ये तोटा होण्यांची देखील दाट शक्यता नाकारता येत नाही.

व तसेच हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यांकरीता व म.न.पा.च्या तिजोरीत म.न.पा.ला कोणत्याही प्रकारचा खर्च न करता दर महिन्याला शहर बस सेवा निधीद्वारे स्वामित्व धन रॉयल्टीद्वारे अंदाजे ( टाटा ४०७ ) ४० बसेसद्वारे हा उपक्रम राबविल्यास महिन्याकाठी दीड ते दोन लाख रु जमा होऊ शकतात.

तरी अहमदनगर म.न.पा.ला शहर बस वाहतुक बी.ओ.तत्वावर सुरु करण्यांकरीता '' परिवहन उपक्रम '' चालविण्यांचा अनुभव असणां-या सर्व संस्था / फर्म / एजन्सींना कळवून अभिकर्ता नेमण्यांसाठी दरपत्रके मागविण्याकरीता वर्तमानपत्रत अभिकर्ता नेमण्यांबाबतची दरपत्रकासुचना जाहिर निविदा प्रसिध्द करण्यांस व म.न.पा.च्या सर्व अटी,शर्ती व नियम तसेच रितसर करारनामा करुन देणां-या अभिकर्त्यास तसेच जास्तीत जास्त टक्के रॉयल्टी देणां-या अभिकर्त्यास हा उपक्रम चालविण्यांस देणे योग्य वाटते. तथापि आदेशार्थ. सविनय सादर.तसेच हा उपक्रम राबविण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन अभिकर्ता नेमण्यांबाबतची सुचना प्रसिध्द करण्यांकामी येणां-या जाहिरातीच्या खर्चास देखील मंजुरी मिळावी हि विनंती.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत शहर बससेवा उपलब्ध करुन देणे बाबत मा.महापौर अ.नगर मनपा व एस.टी.महामंडळ यांचे पत्रानुसार प्राथमिक माहिती घेतली असता मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम ६६ ( २० ) अन्वये महानगरपालिकेला शहर बस वाहतूक राबविता येते. यास्तव रिपोर्टात नमूद केल्याप्रमाणे मनपाची सध्याची आर्थिक स्थिती नाजुक असल्यांने बी.ओ.तत्वावर शहर बसवाहतुक सुरु केल्यास म.न.पा.ला रॉयल्टीद्वारे आर्थिक उत्पन्न मिळू शकेल. तसेच नागरिकांनाही सेवा उपलब्ध होईल.साधारणत : पुढील १० वर्षाच्या कालमर्यादेकरीता जाहिर निविदा प्रसिध्द करुन जो निविदाकार मनपाला जास्त रॉयल्टी देऊ करेल त्या निविदाकार संस्थेकडून बससेवा चालू करणेंस हरकत नाही.

रॉयल्टी करीता पुढील दोन बाबी पैकी एका पध्दतीचा अवलंब करता येणे उचित वाटते.

१.रोजच्या एकुण होणां-या कि.मी.नुसार प्रति कि.मी.काही रक्कम किंवा

२.रोजच्या एकुण उत्पन्नावर टक्केवारी स्वरुपात काही रक्कम.

शहर बसवाहतुकी करीता शहरात सध्या एस.टी.महामंडळाच्या चर्चेनुसार एकुण १० मार्ग असून एकुण २८ मोठया गाडयांची आवश्यकता आहे. परंतु आपले प्रस्तावाप्रमाणे शहरात छोटया गाडयांची आवश्यकता असल्यांने एकुण ४० गाडया सुचविलेल्या आहेत.

तरी सदरचा उपक्रम राबविण्यांसाठी वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन जास्तीत जास्त रॉयल्टी देण्यां-या फर्मला अथवा अभिकर्त्याला त्यांच्याकडून रितसर करारनामा करुन घेणे योग्य वाटते. तसेच परिवहन मंडळाचे ना हरकत दाखला व आर.टी.ओ. ऑफिस कडील परवानगी घेण्यांस देखील मंजुरी मिळावी. यास्तव मनपाचे सर्वसाधारण सभेत या विषयावर सांगोपांग चर्चा करुन योग्य तो निर्णय घेणे योग्य वाटते. तथापि आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त ( कर ) यांचा अभिप्राय की, '' अहमदनगर मनपाच्या हद्दीत मनपा मार्फत शहर बससेवा सुरु करणे मनपाचे कर्तव्य आहे. मनपाने वाहन खरेदी करुन चालविल्यास वाहन खर्च,वाहक,चालकांचा खर्च तसेच देखभाल दुरुस्ती इत्यादी बाबींचा मोठया प्रमाणात खर्च होईल. व मनपाच्या सध्याच्या आर्थिक स्थितीचा विचार करता मनपाने स्वत : ही सेवा देण्याऐवजी खाजगी

संस्थांकडून कंत्राटी पध्दतीने शहर वाहतुक सेवा चालविणे संयुक्तीक वाटते.सबब खाजगी संस्था / व्यक्ती यांचेकडुन प्रस्ताव मागवून सर्वात जास्त रॉयल्टी देणां-या व्यक्ती / संस्था यांच्याबरोबर सामंजस्य करार किमान १० वर्षाकरीता करुन सेवा उपलब्ध करुन देणे योग्य वाटते.

अहमदनगर शहराचा विस्तार पाहता व लोकसंख्येचा विचार करता १५ बस गाडया शहरात सुरु करणे योग्य राहील. तसेच खाजगी संस्थेने या गाडया मनपाच्या नावे खरेदी करण्यांची अट घालणे योग्य वाटते. म्हणजेच ही सेवा मध्यंतरी खंडीत होणांर नाही किंवा सदर वाहने इतरत्र वापरली जाणार नाही.मान्य असल्यास प्रस्ताव मंजुरीस्तव मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, '' उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले. शहराचे हद्दीमध्ये महत्वाचे प्रवासी मार्गावर प्रायोगिक तत्वावर खाजगीकरणांचे माध्यमातून बी.ओ.( बिल्ड - ऑपरेट ) तत्वावर १५ बस गाडया ( मोठया + लहान ) चालविणेसाठी निविदा मागविणेंस व सदरची परिवहन सेवा शहरात चालविणें बाबत धोरणात्मक निर्णय घेणेंस हरकत नाही.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( कर ) व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयासाठी मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

अहमदनगर शहरामध्ये प्रवासी बस सेवा बी.ओ.तत्वावर चालु करणे बाबत चर्चा:-

१. मा.श्री.अनंत जोशी :- नागरिकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. हा प्रस्ताव सभेपुढे ठेविल्या बाबत त्यांनी मा.महापौरांचे अभिनंदन केले. व भाजपा- शिवसेना युतीने याबाबत यापुर्वी पत्रे दिलेली आहेत. नागरिकांनी याबाबत महानगरपालिकेला सहकार्य करावे असे सुचविले.

२. मा.श्री.सूळ :- चांगली योजना सभेपुढे ठेविल्या बद्दल अभिनंदन केले. नगर शहरातील रस्ते मोठे नसल्यामुळे लहान गाडया घेण्यांबाबत विचार करण्यांत यावा. महानगरपालिकेने स्वत:च्या नावावर गाडया घ्याव्यात हे धोरण लवचिक करावे. लवचिक धोरण घेवुन सेवा देण्याचा प्रयत्न करावा.

३. मा.श्री. डॉ.पाउञलबुध्दे :- यांनी सांगितले की, एस.टी.ने शहर बस सेवा बंद केलेली असल्यामुळे नागरिकांना प्रवास परवडत नाही. तरी उपनगरामध्ये सेवा उपलब्ध करुन द्यावी. जाचक अटी करु नयेत. व शहराच्या काना कोप-यापर्यत बस सेवा उपलब्ध करुन द्यावी त्यामध्ये केडगांव, सारसनगर, मुकुंदनगर, कल्याण रोड इत्यादी समावेश करावा. व प्रस्ताव मंजूर करावा असे सुचविले.

४. मा.सौ.वर्षा सय्यद :- अपघात विमा बाबत तरतुद करण्यांत यावी.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, संबंधिताची याबाबत जबाबदारी राहणांर आहे.

५. मा.श्री.मनेष साठे :- एस.टी.महामंडळाने शहर सिटी बससेवा बंद केलेली असल्याने नागरिकांना फार त्रास होत आहे. त्यामुळे हा प्रस्ताव ठेवल्याबददल मा.महापौरांचे अभिनंदन करतो. सदर बससेवा १० ते १५ किलोमीटर पर्यंत चालविण्यांत यावी व त्यास मंजूरी देण्यांत यावी.

६. मा.सौ.शिंदे :- उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने त्यास मंजूरी द्यावी ही विनंती.

७. मा.श्री.वाकळे :- शहर बस वाहतुक योजना उपयुक्त अशी आहे. एस.टी.सेवा तोटयात असल्याने ती बंद करण्यांत आलेली आहे. त्यामुळे मनपाने शहर बस वाहतुक योजना चालविणे योग्य आहे. तरी सदर प्रस्तावास मंजूरी द्यावी.

८. मा.श्री.संदिप कोतकर :- प्रस्तावास मंजूरी द्यावी. अभिनंदन करतो.

९.   मा.श्री.सुरेश शेळके :- महानगरपालिकेने शहर बस वाहतुक योजना राबवावी. सदर प्रस्तावा बाबत मा.महापौरांचे अभिनंदन. तसेच या करीता नियंत्रण कक्ष स्थापन करावा. तसेच परिवहन समिती नेमावी. व हा विषय मंजूर करावा असे सुचविले.

१०.   मा.श्री.मिलींद गंधे :- शहर बस वाहतुक हा नागरिकांचा जिव्हाळयाचा विषय आहे. शहरामध्ये बससेवा सुरु होणार याबाबत चर्चा चालु आहे. केडगांव कोप-या पासुन ते एम.आय.डी.सी. पर्यत बससेवा चालु कराव्यात. छोटया बसेस घेतल्या पाहिजेत. चांगल्या पध्दतीने बस सेवा चालु करावी असे सुचविले.

११.   मा.श्री.आगरकर :- रॉयल्टी घेण्या बाबत १. रोज किती किलोमीटर बस सेवा चालते. किंवा रोज किती उत्पन्न जमा होते यावर रॉयल्टी घेण्या बाबतचा प्रश्न सभेपुढे मांडलेला नाही. १० वर्षाचा करार उचित आहे काय. ही मुदत मोठी वाटते. ती पाच वर्षाची मुदत द्यावी व दर तीन वर्षांनी दरामध्ये वाढ करावी असे प्रश्न उपस्थित केले. करार मोडला गेल्यास बँक गॅरंटी इत्यादी बाबतचे प्रोव्हीजन करावे.

मा. महापौर यांनी खुलासा केला की, ठराव मंजूर करावा व पुढील सविस्तर प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेविला जाईलच असे सांगितले.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर ठराव सर्वानुमते मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. मनेष द.साठे,

अनुमोदक : मा.सौ.कांताबाई अ.शिंदे,

सही/-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ५ दि. १९-७-२००५.

प्रस्तावाचा विषय - मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : खालील मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविले.

| अ.नं. | मा.सदस्यांचे नांव | सभा रजेची तारीख |
|---|---|---|
| १ | मा.सौ.भागानगरे मनिषा प्रकाश | १९-७-२००५ |
| २ | मा.श्री.मैड सतिष बबनराव | १९-७-२००५ |
| ३ | मा.सौ.गंगेकर अंजना राजू | १९-७-२००५ |

ठराव : रजेचे अर्ज मंजूर.
नोंद घेण्यांत येत आहे.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.